# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२४

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(१) ९५९६ (२२-०६-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंत्रालयातील परिवहन विभागाचे उपसचिव तसेच राज्यातील काही परिवहन अधिकाऱ्यांवर गैरव्यवहाराचा आरोप करणारी तक्रार नाशिक येथील मोटर वाहन निरीक्षकांनी दिनांक १६ मे, २०२१ रोजी पंचवटी पोलीस ठाणे (जि.नाशिक) येथे करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश पोलीस आयुक्त, नाशिक यांनी पोलीस उपायुक्त (गुन्हे शाखा) यांना दिले असून ५ दिवसांत अहवाल सादर करण्याचेही निदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने याबाबतचा चौकशी अहवाल पोलीस उपायुक्त (गुन्हे शाखा) यांनी पोलीस आयुक्त, नाशिक यांना सादर केला आहे काय, सदरहू अहवालातील मुद्दयांचे थोडक्यात स्वरूप काय आहे, तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०२-२०२४) :** (१) व (२) होय.

(३) पोलीस आयुक्त, नाशिक यांनी सादर केलेला अहवालात राज्यातील BSIV वाहनांच्या नोंदणीमधील अनियमितता, सीमा तपासणी नाका व वायुवेग पथकाचे कामकाज, परिवहन विभागातील बदल्या/पदस्थापना यामध्ये भ्रष्टाचार झाल्याचा आरोप, परिवहन विभागातील क्षेत्रिय स्तरावरील अधिकाऱ्यांच्या एकमेंकाविरुध्द तक्रारी ई. मुदृांचा समावेश आहे.

BSIV वाहनांच्या अनियमित नोंदणीबाबत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,सिंधुदुर्ग मार्फत श्री.साईनाथ म्हापसेकर, रा.कुडाळ, ता.सिंधुदुर्ग व श्री.सर्जेराव भोवड, रा.कोल्हापूर यांच्याविरुध्द सिंधुदुर्गनगरी पोलीस ठाणे येथे गुन्हा र.क्र.२५/२०२० कलम ४०६, ४२०, ४६४, ४६८ प्रमाण दिनांक

०८/०८/२०२० रोजी गुन्हा दाखल केलेला आहे. तसेच, राज्यातील अन्य कार्यालयात BSIV वाहनांची नियमबाहय नोंदणी झाल्याच्या घटना झाल्या असल्यास पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्याबाबत परिवहन आयुक्त यांना कळविण्यात आले आहे.

सीमा तपासणी नाका, वायुवेग पथकाचे कामकाज परिणामकारक होण्याबाबत परिवहन आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली Task Force स्थापन करण्यात आला आहे.

परिवहन विभागातील बदल्या व पदस्थापना आस्थापना मंडळाच्या शिफारशीनुसार योग्य प्राधिकरणाची मान्यता घेऊन नियमानुसार करण्यात आल्या आहेत.

तसेच, परिवहन विभागातील क्षेत्रिय स्तरावरील अधिकाऱ्यांच्या एकमेंकाविरुध्दच्या तक्रांरीबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ या नियमावलीतील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जवळ असलेले कांदळवन अनधिकृतपणे जाळण्यात आल्याबाबत

**(२) ९९९१ (१८-०६-२०२१) श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जवळ असलेले कांदळवन अनधिकृतपणे जाळण्याचा प्रयत्न करणाऱ्या काही भूमाफियांवर/समाजकंटकांवर तात्काळ कारवाई करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांना माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे.

श्री.रमेश पाटील मा.आमदार विधानपरिषद यांनी प्रस्तुत विषयाबाबत अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई यांचे कार्यालयास माहे एप्रिल२०२१ मध्ये निवेदन दिले आहे.

(२) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी रायगड यांचेकडून करण्यात आलेल्या चौकशी अहवालाची प्रत अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई यांचे दिनांक ३१/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये श्री रमेश पाटील, मा.आमदार, विधानपरिषद यांना पाठविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद येथील पोलीस मुख्यालयासमोरील बेकायदेशीर बांधकाम परवान्याबाबत

**(३) १९०३५ (०८-०८-२०२३) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद नगरपरिषदेंतर्गत श्री.प्रसाद रंगनाथ पाटील व सौ.पूजा प्रसाद पाटील यांचेवर बेकायदेशीर बांधकाम परवाना प्रकरणी आनंद नगर पोलीस स्टेशन येथे भा.दं.वी.४२० नुसार गुन्हा दाखल आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक २० फेब्रुवारी, २०२३ रोजी जा.क्र. २०२३ नुसार विद्यमान मुख्याधिकारी यांना प्रस्तुत प्रकरणातील मूळ संचिका उपलब्ध होत नसल्याबाबत खात्री करुन घ्यावी अन्यथा विवादित संचिका उपलब्ध होत नसल्याबाबत गुन्हा दाखल करावा, असे आदेश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सहाय्यक संचालक, नगररचनाकार, उस्मानाबाद यांनी सादर केलेल्या अहवालानुसार महाराष्ट्र औद्योगिक नगररचना नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५१ नुसार कार्यवाही करून अनुपालन अहवाल कार्यालयास सादर करण्याबाबतचे लेखी पत्र मुख्याधिकारी यांना दिनांक २० फेब्रुवारी, २०२३ रोजी देवुनही विद्यमान मुख्याधिकारी यांनी दिनांक ३ फेब्रुवारी, २०२३ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ व ५४ अन्वये दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३ रोजी जा.क्र. ५०६/२३ नुसार नोटीस जारी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश कलम ५१ नुसारची नोटीस व विद्यमान मुख्याधिकारी यांची कलम ५३ व ५४ अन्वयेच्या नोटीशीमध्ये विसंगती दिसून येणे तसेच मा.न्यायालयाने स्पष्ट आदेश देवुनही विद्यमान मुख्याधिकारी यांनी दिनांक २१ एप्रिल,२०२३ रोजी सदरील अनधिकृत, बेकायदेशीर बांधकामांसबंधी कलम ५१ च्या नोटीसऐवजी कलम ५३ व ५४ ची नोटीस देवुन सदर बांधकाम पाडण्याऐवजी संबंधितांना बांधकाम करण्यास मदत केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्यमान मुख्याधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०२-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.

पोलीस मुख्यालयासमोर केलेल्या बांधकामाबाबत नगरपरिषद कार्यालयात दस्तऐवज आढळून आले नाहीत. सदर बांधकामास बोगस बांधकाम परवानगी दिल्याचे निदर्शनास आल्याने तत्कालीन मुख्याधिकारी यांच्यावर आनंदनगर पोलीस स्टेशन, धाराशिव येथे दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी गुन्हा नोंद क्र.११७/२०२३ दाखल करण्यात आला आहे.

तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३ व कलम ५४ नुसार संबंधित भुखंड धारकावर दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३ रोजी नोटीस बजावण्यात आली. सदर नोटीशीस मा.जिल्हा न्यायाधिश (वरिष्ठ स्तर), दिवाणी न्यायालय, धाराशिव यांच्या दिनांक २३ मे, २०२३ रोजीच्या आदेशान्वये स्थगिती दिली. सदर आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे रिट याचिका (स्टॅम्प) क्र.२०५७५/२०२३ दाखल केली आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(५) सदर प्रकरणी नगरपरिषदेमार्फत तत्कालीन मुख्याधिकारी, धाराशिव नगरपरिषद यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, धाराशिव येथे दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील रस्त्यांच्या कामासाठी देण्यात आलेल्या निधीबाबत

**(४) १९०९० (०८-०८-२०२३) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील चारठाणा ते जिंतूर रस्ते सुधारणा, गंगाखेड ते कोल्हा रस्ता, इंजेगाव ते सोनपेठ चारपदरी रस्ता, इसाद ते किनगाव दोन पदरी रस्ता, पारवा-असोला परभणी बाहय वळण, जिंतूर-शिरडशहापूर राष्ट्रीय महामार्ग, पाथरी-सेलू रस्ता राष्ट्रीय महामार्ग अशा विविध रस्त्यांच्या कामासाठी १ हजार २०० कोटी रुपयांचा निधी व नवीन कामाचे भूमिपूजन मा.केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री महोदयांनी सन २०२३ मध्ये केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील सर्व कामांची सद्य:स्थिती, त्यासाठी करण्यात येणारे भूसंपादन, कामांसाठीचा निधी वितरण तसेच सदर कामासाठींचा कालावधी इत्यादी बाबतची कामनिहाय अद्ययावत माहितीचा तपशिल काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर विकास कामे विहित कालावधीत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१४-०३-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

पारवा-आसोला परभणी बाहयवळण, जिंतूर-शिरडशहापूर, पाथरी- सेलू देवगांव फाटा या राष्ट्रीय महामार्गाच्या रुपये १२०२.९७ कोटी एवढया रक्कमेच्या कामांचे मा.केंद्रीय मंत्री, महोदय, रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, यांनी दिनांक २५ फेब्रुवारी, २०२३ रोजी भूमीपूजन केले आहे. तसेच सदर दिवशी इजेगाव ते सोनपेठ, इसाद ते किनवट या राष्ट्रीय महामार्गाच्या रुपये ३९३ कोटी एवढया रक्कमेची कामे आर्थिक वर्ष २०२२-२३ साठीच्या कार्यक्रमामध्ये मंजूरी दिल्याची घोषणा मा.केंद्रीय मंत्री, महोदय रस्ते वाहतूक व महामार्ग यांनी केली.

(२) पारवा-असोला (रा.म.६१) या रस्त्याची लांबी १५.२१४ कि.मी.असून या कामाची किंमत रुपये ४९६.६४ कोटी एवढी आहे. या लांबीमध्ये ४.९५ जमिनीचे भूसंपादन पूर्ण झाले असून ३.९५ हेक्टर जमीनीचे भूसंपादन प्रगतीत आहे. सद्य:स्थितीत काम प्रगतीपथावर आहे.

जिंतूर-शिरडाशहापूर (रा.म.७५२-I) या रस्त्याची लांबी ४८ कि.मी.असून या कामाची किंमत रुपये ४१४.८१ कोटी एवढी आहे. सद्य:स्थितीत काम प्रगतीपथावर आहे.

परभणी ते कोल्हा (रा.म.६१) या रस्त्याची लांबी १९.५० कि.मी.असून या कामाची किंमत रुपये २८१.७८ कोटी एवढी आहे. या लांबीमध्ये ०.०३१ हेक्टर जमिनीचे भूसंपादन प्रगतीत आहे. सद्य:स्थितीत काम प्रगतीपथावर आहे.

गंगाखेड ते परभणी (रा.म.७५२-K) या रस्त्याची लांबी ३५.८८५ कि.मी.असून या कामाची किंमत रुपये २३९.९९ कोटी एवढी आहे. सदर काम अंतिम टप्प्यात आहे.

इंजेगाव ते सोनपेठ (रा.म.५४८-B) या रस्त्याची लांबी २५.५० कि.मी. असून सदर कामाचा प्रस्ताव मंजूरीसाठी सक्षम प्राधिकाऱ्यास सादर केलेला आहे. या लांबीमधील १.७९ हेक्टर जमिनीचे

भूसंपादन प्रगतीपथावर आहे.

पाथरी सेलू ते देवगांव फाटा (रा.म.५४८-B) या रस्त्याच्या एकूण ४२.५० लांबीपैकी १२.५० कि.मी. लांबीमधील रुपये १४७.५६ कोटी रक्कमेचे काम अंतिम टप्प्यात आहे व ३० कि.मी. लांबीच्या कामाचा प्रस्ताव मंजूरीसाठी सक्षम प्राधिकाऱ्यास सादर केलेला असून या लांबीमधील ०.७० हेक्टर जमिनीचे भूसंपादन प्रगतीपथावर आहे

इसाद ते किनगाव (रा.म.७५२ K) व चारठाण ते जिंतूर (रा.म. ७५२-I) या रस्त्यांची अनुक्रमे लांबी ३३.५५ कि.मी. व २२ कि.मी. असून सदर कामाचा प्रस्ताव मंजूरीस्तव सक्षम प्राधिकाऱ्यास सादर केलेला आहे.

(३) विहित कालावधीमध्ये काम पूर्ण करण्याचे नियोजन तसेच वार्षिक आराखड्यानुसार प्रस्ताव मंजूरीस्तव सादर करण्यात आलेले असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील गृहनिर्माण सोसायट्यांपैकी ६० टक्के सोसायट्या अद्याप कन्व्हेयन्स डिडपासून वंचित असल्याबाबत

**(५) १९७२९ (०८-०८-२०२३) श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे : दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १३ मधील प्रश्न क्रमांक १४६३५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एकूण गृहनिर्माण सोसायट्यापैकी ६० टक्के सोसायट्या अद्याप कन्व्हेयन्स डिडपासून वंचित असल्याची माहिती दिनांक ८ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमीन मालक आणि विकासक यांना इमारतीच्या जमिनीची मालकी सोडायची नसल्याने सोसायटीच्या नावे कन्व्हेयन्स डिड होत नसल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहकार विभागाने यासंदर्भात काही धोरण आखले आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१९-०३-२०२४) :** (१) होय.

(२) व (३) ज्या प्रकरणात विकासक / जमीन मालक अभिहस्तांतरणासाठी असहकार्य करतात, अशा प्रकरणी मानीव अभिहस्तांतरण करण्याबाबत तरतूद आहे. याबाबत दिनांक २२/०६/२०१८ रोजी सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित केला आहे. तसेच सहकार आयुक्त यांनी दिनांक ०४/०४/२०२२ च्या पत्रान्वये संस्था नोंदणीवेळीच मानीव अभिहस्तांतरणासाठी आवश्यक कागदपत्रे जमा करून घेण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चैताली (ता.जि.सातारा) सहकारी गृहनिर्माण संस्था कोडोली, या संस्थेमधील गैरकारभाराबाबत

**(६) २०००४ (०८-०८-२०२३) श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोडोली (ता.जि.सातारा) येथे चैताली सहकारी गृहनिर्माण संस्था या गृहनिर्माण संस्थेमध्ये प्रशासकीय नियुक्तीनंतर संस्थेच्या चेअरमनबरोबर संगनमत करुन संस्थेचा कारभार मनमानी व बेकायदेशिररित्या चालविला जात असून गैरहेतूने संस्थेच्या सभासद संख्येत वाढ करुन निवडणूक प्रक्रिया बेकायदेशीर राबविणे व वेगवेगळ्या नावाने कारभार करणे तसेच संस्थेचा ताळेबंद लेखी स्वरुपात अद्याप सादर न करणे तद्नुषंगिक अन्य तक्रारी गृहनिर्माण संस्थेच्या मूळ सभासदांनी शासनाकडे आतापर्यंत वारंवार केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारी करुनही अद्याप कारवाई न झाल्यामुळे, दिनांक १४ मार्च, २०२३ रोजी मा.सहकार आयुक्त, मा.सहकार मंत्री तसेच जिल्हा प्रशासन अधिकारी यांचेकडे पुन्हा तक्रार निवेदन देऊनही कारवाई झाली नसल्याचे दिनांक ७ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीमध्ये काय आढळून आले, त्यानुसार सदर गृहनिर्माण संस्थेचे प्रशासक तसेच गृहनिर्माण संस्थेचे चेअरमन व संचालक मंडळ यांचे विरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१४-०३-२०२४) :** (१) होय.शासनाकडे या संदर्भात तक्रार प्राप्त झाली होती.

(२) व (३) नाही.प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,सातारा यांनी तक्रारदार,प्राधिकृत अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित सहायक निबंधक यांची सुनावणी घेऊन तक्रारीचे निरसन केले आहे.तसेच, वेळोवेळी प्राप्त तक्रार अर्जांवर कार्यवाही केली आहे. दिनांक २३/७/२०२३ रोजी निवडणूक होऊन संचालक मंडळ अस्तित्वात आले आहे. चैताली गृहनिर्माण सहकारी संस्था,कोडोली (ता,सातारा) येथे संचालक मंडळ सध्या कार्यरत आहे.संस्थेच्या कोणत्याही तक्रारी सध्या प्रलंबित नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अलिबाग येथील वेल्सस्पन मॅक्सस्टील कंपनी शेतकऱ्यांच्या मागण्यांचे दुर्लक्ष करित असल्याबाबत

**(७) २०३३६ (०८-०८-२०२३) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेल्सस्पन मॅक्स स्टील या कंपनीने सन १९८९- ९० मध्ये अलिबाग मधील चेहेर, मीठेखार, निडी, वाघुळवाडी, मुरुड येथील शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी कमी दराने संपादित केल्या असून संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा योग्य मोबदला दिला जाईल, ३६ महिन्यांत प्रकल्पग्रस्तांना रोजगार दिला जाईल व प्रकल्प सुरु होईपर्यंत मानधन देण्यात येईल तसेच शेतकऱ्यांच्या मुलांनाही नोकरीत सामावून घेण्यात येईल

तसेच नव्याने संपादित केलेल्या जमिनीच्या मोबदल्यात वाढीव रक्कम दिली जाईल असा सामंजस्य करार सदर कंपनीच्या माध्यमातून करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आजतागायत ३२ वर्षे पूर्ण होऊनही कंपनीने उक्त कराराचे पालन न केल्याने अन्यायग्रस्त शेतकऱ्यांनी संपादित केलेल्या जमिनी परत करण्याबाबतच्या मागणीचे निवेदन उप विभागीय अधिकारी, अलिबाग यांच्याकडे दिले असून प्रकल्पग्रस्त शेतकरी व कंपनी व्यवस्थापन यांची संयुक्त बैठक बोलावून मार्ग काढण्यात यावा अन्यथा आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच कराराचे पालन न करणाऱ्यां कंपनी व्यवस्थापनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०३-२०२४) :** (१), (२) व (३) मौजे साळाव, निडी, चेहेर, व मिठेखार ता.मुरूड, जि.रायगड येथील जमीनी Industrialisation in the under devloped area by SICOM (अविकसित भागात औद्योगिक कारणासाठी सिकॉमकरीता) भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये विशेष भूसंपादन अधिकारी, रायगड अलिबाग या कार्यालयामार्फत संपादन करण्यात आलेले आहे.

तसेच, दिनांक १४/०१/१९९० रोजी ग्रासीम इंडस्ट्रिज लि/विक्रम इस्पात आणि दिनांक १९/११/२००९ रोजी मे. वेल्सस्पन मॅक्सस्टील कंपनी व खातेदार/जमीन मालक यांच्यात परस्पर खाजगीरित्या सामंजस्य करार झाले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्यात तीन प्रकारची १००० उद्याने विकसित करण्यात येणार असल्याबाबत

**(८) २०५४५ (०८-०८-२०२३) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त वर्षभरात राज्यात तीन प्रकारची १००० उद्याने विकसित करण्यात येत असून यामध्ये पंचायतन, अमृत आणि बेल या उद्यानांचा समावेश असल्याची बाब माहे एप्रिल २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंचायतन वन उद्यान अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यातील २५ गावांमध्ये ही उद्याने उभारण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणत्या गावांची निवड केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०२४) :** (१) होय हे खरे आहे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमीत्त राज्यात पंचायतन वन उद्यान, अमृत वन उद्यान आणि बेल वन उद्यानांची निर्मिती करण्याबाबत महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक १०/०४/२०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयानुसार राज्यात प्रत्येक जिल्ह्यातील २५ गावांमध्ये

पंचायतन वन उद्यान, ७५ शहरात/जिल्ह्यांच्या/तालुक्यांच्या/स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ठिकाणी अमृत वन उद्यान आणि धार्मिक स्थळांच्या ७५ ठिकाणी बेल वन उद्यान असे एकूण ९७५ उद्यानांची निर्मिती करण्यात येत आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक १०/०४/२०२३ मधील तरतुदीनुसार पात्र ठरणाऱ्या राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील २५ गावांमध्ये अनुकुल जमिनीच्या उपलब्धतेनुसार पंचायतन वन उद्यानांची निर्मिती करण्यात येत आहे.
(४) सदर योजना ही सन २०२३-२४ ते २०२९-३० या ७ वर्षाच्या कालावधीमध्ये राबविण्यात येत असल्याने विलंब झालेला नाही.

---

## मराठी भाषा विद्यापीठ स्थापनेस विलंब होत असल्याबाबत

**(९) २१०५१ (०५-०१-२०२४) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत आसगावकर, श्री.किरण सरनाईक, श्री.कपिल पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: मुंबई तसेच रिध्दपूर, (जि.अमरावती) येथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्याबाबत मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांचे अध्यक्षतेखाली, विद्यापीठ समितीचे अध्यक्ष, प्रधान सचिव, भाषा विभाग, मंत्रालय यांचेसह समितीच्या सदस्यांच्या उपस्थितीत मंत्रालयात दिनांक ५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान बैठक झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू बैठकीत "मराठी भाषा विद्यापीठ स्थापनेबाबतचा" अहवाल दोन महिन्यांत शासनास सादर करावा, असे मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांनी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना आदेशित केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार विद्यापीठ स्थापनेबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय, तसेच अमरावती जिल्ह्यात हे विद्यापीठ सुरू करण्यासंदर्भात जागा निश्चित करण्याचे धोरण शासनाने ठरविले असून किती कालावधीत मराठी भाषा विद्यापीठ शासन सुरू करणार आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (१२-०३-२०२४) :** (१) खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) राज्यात मराठी भाषा विद्यापीठ सुरु करण्यासाठी मराठी भाषा विद्यापीठ अधिनियम, दिनांक १५ जानेवारी, २०२४ रोजी अंमलात आला आहे. त्यानुसार सदर विद्यापीठाच्या अधिनियमातील तरतुदींच्या अनुषंगाने विद्यापीठ सुरु करण्याची पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती विभागातील अकोला व वाशिम येथील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व वेतन पथक अधीक्षक पदे भरण्याबाबत

**(१०) २१०५५ (०५-०१-२०२४) श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील अकोला व वाशिम येथील माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रभारी असल्याने कामाची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षणाधिकारी व वेतन पथक अधीक्षक कार्यालयातील अनेक पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने अकोला व वेतन पथक अधीक्षक कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत तसेच पूर्ण वेळ माध्यमिक शिक्षणाधिकारी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबत शासनाची यामध्ये भूमिका काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दिपक केसरकर (०५-०३-२०२४) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) सद्य:स्थितीत सरळसेवेने पदभरती, तसेच पदोन्नतीने व बदलीने पदस्थापना देणेबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार इतर अधिकाऱ्यांकडे देण्यात येऊन कामकाज पार पाडले जात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत नियमानुसार वाटप करण्यात येणारा ८६ हजार क्विंटल कच्चा तांदूळ विभागाच्या मान्यतेविना उचलण्यात आल्याबाबत

**(११) २१२११ (०५-०१-२०२४) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत नियमानुसार वाटप करण्यात येणारा (कोटा) ८६ हजार क्विंटल कच्चा तांदूळ (सीएमआर) अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या मान्यतेविना उचलण्यात आल्याची बाब दिनांक ९ ऑक्टोबर,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने वाहतुकीतून मिळणाऱ्या जादा मोबदल्यासाठी हा तांदूळ गोंदियावरुन अहमदनगरला पोहचविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ८६ हजार क्विंटल कच्चा तांदूळ अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या मान्यतेविना उचलण्यात येणाऱ्या संबंधित दोषी कंत्राटदार व अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (०४-०३-२०२४) :** (१) गोंदिया जिल्ह्यामध्ये ३ महिन्यांच्या आवश्यक नियतनापेक्षा जास्त सीएमआर उपलब्ध असल्याने शासनाने दिनांक ०३/०७/२०२३ च्या पत्रान्वये दिलेल्या मान्यतेनुसार अहमदनगर जिल्ह्यात माहे सप्टेंबर, २०२३ चे ८६ हजार क्विंटल इतके आवश्यक नियतन पुरविण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणी शासन मान्यतेने ८६ हजार क्विंटल कच्च्या तांदुळाचे नियतन अहमदनगर जिल्ह्यास पुरविण्यात आल्यामुळे या प्रकरणी कोणताही गैरव्यवहार झालेला नाही. त्यामुळे दोषींवर कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या रिक्त जागा भरण्याबाबत

**(१२) २१३०९ (०५-०१-२०२४) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १७११३ ला दिनांक २० मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर विभागात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय-१, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय-१ व शासकीय तंत्रनिकेतने-१० अशा शासनाच्या १२ अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र शिक्षण देणाऱ्या संस्था असून या संस्थांमध्ये वर्ग १ ते वर्ग ४ ची एकूण १६९३ पदे मंजूर असून त्यापैकी ११६२ पदे भरलेली आहेत व ५३१ पदे रिक्त आहेत, हे खरेआहे काय,

(२) असल्यास, छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापकांची ११२ पदे मंजूर आहेत त्यापैकी केवळ ६० प्राध्यापक कार्यरत असून ५२ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एवढया मोठ्या प्रमाणावर रिक्त पदे असतानाही सन २०२३-२४ पासून शासन नवीन शैक्षणिक धोरण (एनईपी) लागू करत असून अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका संस्थांतील शिक्षकीय व शिक्षकेतर पदांची भरतीप्रक्रिया राबविण्याकरीता संवर्गनिहाय आरक्षणनिश्चिती व बिंदूनामावलीची तपासणी सहायक आयुक्त (मागास वर्ग कक्ष) व सामान्य प्रशासन विभाग (सा.वि.स.) यांचेकडून करून घेण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने उक्त पदे भरण्याबाबत तसेच सदर भरती प्रक्रिया राबविण्याबाबत संवर्गनिहाय आरक्षण निश्चिती व बिंदूनामावलीची तपासणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (१९-०३-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे,

फेब्रुवारी, २०२३ मधील परिस्थितीनुसार खरे आहे. दरम्यान सेवानिवृत्ती, स्वेच्छा सेवानिवृत्ती, राजीनामा इ. मुळे झालेल्या बदलांनुसार सद्य:स्थितीत वर्ग-१ ते वर्ग-४ ची मंजूर असलेल्या १६९३ पदांपैकी १०९३ पदे भरलेली असून ६०० पदे रिक्त आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील अध्यापकांच्या ९२ मंजूर पदांपैकी सद्या ५९ पदे भरलेली असून ३३ पदे रिक्त आहे.
(३) व (४) होय.

शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांतील अध्यापकीय संवर्गनिहाय आरक्षणनिश्चिती व बिंदूनामावलीची तपासणी सहायक आयुक्त (मागास वर्ग कक्ष) व सामान्य प्रशासन विभाग यांचे कडून करण्यात आलेली आहे.

तद्नंतर, शासकीय अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांतील शिक्षकीय संवर्गातील एकूण ३६० पदे तसेच प्रशासकीय संवर्गातील एकूण ९७ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आले आहे.

त्यापैकी २९८ शिक्षकीय पदांचे व ७८ प्रशासकीय पदांकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी ते आलापल्ली व अहेरी ते सुभाष नगर येथील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(१३) २१५७४ (०५-०१-२०२४) श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहेरी ते आलापल्ली व अहेरी ते सुभाष नगर (जि.गडचिरोली) रस्त्यांची दुरवस्था झाल्याने एका महिलेचा अपघात झाला असून अहेरी ते सुभाष नगर रस्त्यावर खड्डे पडले असल्याने सदर रस्ता दुरुस्त करण्यात यावा, अन्यथा आंदोलन करणेबाबत सरपंच महागाव ग्रामपंचायत यांनी आलापल्ली कार्यकारी अभियंता यांना लेखी निवेदन दिल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (१२-०३-२०२४) :** (१) निवेदन प्राप्त आहे.
(२) राज्य मार्ग क्र.३७० वरील अहेरी ते आलापल्ली दरम्यान लांबी वर ४ कि.मी.लांबीत डांबरीकरणाचे रक्कम रुपये ४०० लक्ष चे मंजूर काम प्रगतीत आहे. उर्वरित ३ कि.मी.लांबीत मंजूर डांबरीकरणाचे कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करुन लवकरच काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

अहेरी ते सुभाष नगर प्रजिमा २४ या रस्त्यावर ९ कि.मी.लांबीत रक्कम रुपये १००० लक्ष डांबरीकरणाचे मंजूर काम प्रगतीत आहे. १ कि.मी लांबीत मंजूर डांबरीकरणाचे मंजूर कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करुन लवकरच काम हाती घेण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव शहरातील डांबरीकरणाची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१४) २१८६४ (०५-०१-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव शहरात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आलेली डांबरीकरणाची कामे अपूर्णावस्थेत असून सदर कामांची संपूर्ण देयके अदा केली असल्याने संबंधित अधिकारी व ठेकेदार यांचेवर कारवाई करणेसंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडे दिनांक २७ ऑगस्ट,२०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने डांबरीकरणाची कामे अपूर्णावस्थेत असतानाही सदर कामांची संपूर्ण देयके अदा करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (२१-०३-२०२४) :** (१) निवेदन प्राप्त नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जामठी-बोदवड (ता बोदवड, जि.जळगाव) येथील रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(१५) २१८६८ (०५-०१-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामठी-बोदवड (ता.बोदवड, जि.जळगाव) येथील रस्त्याची दुरवस्था झालेली असून सततच्या अपघातांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत, सदर रस्ता दुरुस्त करण्याची मागणी तेथील ग्रामस्थांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त रस्ता दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (०१-०३-२०२४) :** (१) जामठी-बोदवड रस्त्याच्या एकूण ८.८ कि.मी. लांबी पैकी जामठी गावाजवळील ५०० मीटर लांबी खराब झाली होती, हे खरे आहे.

(२) सदर लांबीतील रस्त्याच्या सुधारणा करणेचे रक्कम रुपये ३०० लक्ष चे मंजूर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन लवकरच काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

सद्य:स्थितीत सदरील पूर्ण लांबीतील पृष्ठभागाची दुरुस्ती करण्यात आलेली असून रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रांमध्ये सोयी- सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(१६) २२१०१ (०५-०१-२०२४) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड : तारांकित प्रश्न क्रमांक १४८३८ ला दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'यूपीएससी' मध्ये मराठी टक्का वाढविण्यासाठी मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, नाशिक आणि अमरावती येथे भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सहा प्रशिक्षण केंद्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जात असून या ठिकाणी इमारती उभारण्यात आल्या आहेत, परंतु संचालक पद कायम प्रभारी अधिकाऱ्याकडे नियुक्त केले जात असून अनुदान कायम विलंबाने मिळते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या केंद्रासाठी कुठल्याही निधीची तरतूद नसल्यामुळे वेळप्रसंगी वीजेचे बिल भरण्यासही अडचणी येतात त्यामुळे वसतिगृह व कार्यालयांना अंधारात राहावे लागत असून कर्मचाऱ्यांची संख्याही अपुरी असून सदर केंद्रासाठी अग्रीम निधीची तरतूद करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने सदर केंद्रांमध्ये कायमस्वरुपी संचालक पद भरण्याबाबत तसेच अग्रीम निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (२७-०२-२०२४) :** (१) होय.

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या आय.ए.एस., आय.पी.एस. यासारख्या स्पर्धात्मक परिक्षांमध्ये राज्यातील विद्यार्थ्यांचे यशाचे प्रमाण वाढावे यासाठी त्यांना प्रशिक्षण देण्याकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, नाशिक आणि अमरावती येथे भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्रे सुरु करण्यात आलेली आहेत.

(२), (३) व (४) सदर सहाही प्रशिक्षण केंद्रात प्रवेशित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जात आहे. सद्य:स्थितीत भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र, अमरावती व राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई येथे कायमस्वरुपात नियमित संचालक पद भरण्यात आलेले असून नागपूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर व नाशिक येथील संचालक पदाचा कार्यभार प्रभारी स्वरुपात सोपविण्यात आला आहे. सदरहु सर्व प्रशिक्षण केंद्रांना आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

निधी अभावी वीज देयक भरणेत अडचण निर्माण झाल्याने वसतिगृह व कार्यालयास अंधारात रहावे लागल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

एकूण ०६ प्रशिक्षण केंद्रापैकी ०२ प्रशिक्षण केंद्रात संचालक पद कायमस्वरुपी भरण्यात आले असून उर्वरित ०४ प्रशिक्षण केंद्रातील संचालक पद भरणेबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहीरात प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच अधीक्षक गट-ब संवर्गातील पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा

आयोगास मागणीपत्र सादर करण्यात आले आहे. लिपिक संवर्गातील पदभरतीबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाने सिनेट निवडणूका अनिश्चित कालावधीसाठी स्थगित केल्याबाबत

**(१७) २२४७५ (०५-०१-२०२४) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाने पदवीधर मतदारसंघातील १० जागांसाठी सिनेट निवडणुकीसाठी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार दिनांक १८ ऑगस्ट, २०२३ ही अर्ज भरण्याची अंतिम तारीख ठरविण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाने अचानकपणे सिनेट निवडणूका अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करीत असल्याचे परिपत्रक दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ रोजी काढले असल्याने विद्यार्थी वर्गात नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाच्या पदवीधर मतदारसंघातील सिनेट निवडणूका स्थगित करण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरहू निवडणूका कधीपर्यंत घेण्याचे शासनाचे नियोजन आहे ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (२९-०२-२०२४) :** (१) होय.
(२) नाही.
(३) मुंबई विद्यापीठाने गठीत केलेल्या समितीच्या मार्गदर्शनाप्रमाणे विद्यापीठाने मतदार संघातील अल्पश: असलेल्या त्रुटी दुर केल्या आहेत. तसेच पुनश्च नविन मतदारयादी करण्यासाठी मुंबई विद्यापीठाने दिनांक ३०/१०/२०२३ रोजीची अधिसूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली.
(४) मुंबई विद्यापीठाच्या दिनांक ३०/१०/२०२३ रोजीच्या अधिसूचनेमध्ये पदवीधर मतदारसंघाची निवडणूक रविवार दिनांक २१ एप्रिल, २०२४ रोजी निश्चित करण्यात आली आहे.

---

## मुंबईहून गोव्याला जाण्यासाठी रेवस ते रेड्डी प्रस्तावित सागरी महामार्गाच्या कामाबाबत

**(१८) २२५२४ (०५-०१-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईहून गोव्याला जाण्यासाठी रेवस ते रेड्डी हा नवा सागरी महामार्ग प्रस्तावित केला असून यातील पॅकेज दोनच्या कामात ऑलिव्ह रिडले कासवाच्या चार उत्पत्ती स्थानासह चार हेक्टर खारफूटी बाधित होणार असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कॅलिफोर्निया सागरी महामार्गाच्या धर्तीवर कोकणच्या विकासासाठी रायगड जिल्ह्यातील रेवस ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेड्डीपर्यंत या सागरी महामार्गाच्या अंतिम आखणीस सार्वजनिक बांधकाम विभागाने गेल्या वर्षी मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या महामार्गाला मान्यता देत असताना ऑलिव्ह रिडले कासवाच्या जातीचे व खारफुटीचे संरक्षण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१२-०३-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे,
(२) हे खरे आहे.
(३) सर्व खाडीपुलांची आखणी करीत असताना ऑलिव्ह रिडले कासवाच्या प्रजातीचे व खारफूटी संरक्षण करण्याचा पूर्ण प्रयत्न केला असून पुलाची आखणी त्याप्रमाणे करण्यात आलेली आहे.

त्यापैकी केळशी व दाभोळ येथील खाडीमध्ये ऑलिव्ह रिडले कासवाचे वसतिस्थान असल्याची माहिती कांदळवन विभागाकडून प्राप्त झाली आहे. सदर जागेस कोणतीही हानी पोहोचणार नाही याची दक्षता घेऊन पुलांची बांधकामे करण्यात येणार आहेत.

कासवांच्या प्रजनन काळात पुलाचे बांधकाम स्थगित ठेवणे व आवश्यक त्या ठिकाणी पुलाच्या दोन्ही बाजूस ध्वनि प्रतिबंधक कठडे बसविणे इ. खबरदारी घेण्यात येऊनच तसेच वन विभागाच्या खारफुटी (Mangrove cell) च्या मार्गदर्शनाखाली पुलाचे बांधकाम हाती घेण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मोर्शी जि.अमरावती तालुक्यातील अप्पर वर्धा धरणग्रस्तांच्या मागण्यांबाबत

**(१९) २२६०६ (०४-०१-२०२४) श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोर्शी (जि.अमरावती) येथील अप्पर वर्धा धरणग्रस्तांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी मंत्रालयात संरक्षक जाळयांवर उड्या मारुन आंदोलन केल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, या धरणग्रस्तांच्या प्रलंबित मागण्यांची माहिती घेवून मागण्या मान्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अप्पर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २७/०९/२०२३ रोजी सर्व संबंधित विभागांसोबत व प्रकल्पग्रस्तांचे प्रतिनिधी यांचे सोबत बैठक सपन्न झाली.या आंदोलनाचे अनुषंगाने मा.मंत्री, मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन यांनी त्यांचे दालनात दिनांक ५ ऑक्टोंबर २०२३ रोजी

बैठक घेतली. तसेच मा.मंत्री, मदत व पुनर्वसन, यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालय,नागपुर येथे दिनांक १३ डिसेंबर २०२३ रोजी बैठक घेण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालोंड (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) येथे गड नदीवर गणेश घाट बांधण्याबाबत

**(२०) २२७०३ (०५-०१-२०२४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालोंड (ता.मालवण जि.सिंधुदूर्ग) येथे गड नदीवर गणेश घाट बांधून मिळण्यासाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सिंधुदूर्ग यांना मालोंड गावचे सरपंच व ग्रामस्थांनी दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन सिंधुदुर्ग जिल्हयातील मालोंड येथे गड नदीवर गणेश घाट बांधुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (२९-०२-२०२४) :** (१) सदर निवेदन संबंधित कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे अप्राप्त आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.